| | | |
|---|---|---|
| | # पोलीस अधीक्षक कार्यालय,वजिराबाद चौक नांदेड<br>EMAIL ID:- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com | |

## प्रेसनोट

दिनांक–02.10.2025

## सिटी स्ट्रिट सेफ्टी पथकाची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे, दारू पिणाऱ्यांसाठी जागा उपलब्ध करून देणारे यांचेवर धडक कारवाई..

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने मा. **श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख **सपोनि श्री भागवत नागरगोजे** व चार्ली पोलीस अंमलदार यांनी नांदेड शहरात दिनांक 01 ऑक्टोबर 2025 रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे व दारू पिणा–यासाठी जागा उपलब्ध करून देणारे इसमांवर करण्यात आलेली कारवाई खालील प्रमाणे

1) **पोलीस स्टेशन भाग्यनगर** :– हद्दीत सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान सम्राट चौक येथे 01 इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्याचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच नक्षत्र बॅक्वेट हॉल, जय भवानी चौक येथे 04 इसम हे दारू पिणेसाठी ग्लास,पाणी पाऊच ची विक्री करत असताना मिळून आल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

2) **पोलीस स्टेशन विमानतळ** :– हद्दीत सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान शोभानगर येथे 03 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच माळटेकडी येथे 02 इसम हे दारू पिणेसाठी ग्लास,पाणी पाऊच ची विक्री करत असताना मिळून आल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन विमानतळ येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

3) **पोलीस स्टेशन इतवारा** :– हद्दीत सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान जुना मोंढा येथे 01 इसम हा दारू पिणेसाठी ग्लास,पाणी पाऊच ची विक्री करत असताना मिळून आल्याने त्याचेवर पोलीस स्टेशन इतवारा येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

4) **पोलीस स्टेशन शिवाजीनगर** :– हद्दीत सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान कुसुमताई चौक येथे 03 इसम हे दारू पिणेसाठी ग्लास,पाणी पाऊच ची विक्री करत असताना मिळून आल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

5) **पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण** :– हद्दीत सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान ढवळे कॉर्नर येथे 03 इसम हे दारू पिणेसाठी ग्लास,पाणी पाऊच ची विक्री करत असताना मिळून आल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

**6) दामिनी पथक :-** दामिनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्याण विसावा गार्डन परिसर,बाबानगर येथे 05 इसम हे आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळुन आल्याने त्यांचेवर पो स्टे शिवाजी नगर येथे कलम 110/117 म.पो.का. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा संबधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड